**CNR. No.MHBU**090012962021.

**निशाणी क्रमांक–३१.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २७/०९/२०२१ | | |
| नोंदणी दिनांक | : | २७/०९/२०२१ | | |
| निकाल तारीख | : | ०५/०५/२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | ०४ | ०७ | ०८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय, जळगाव (जामोद).**

**(पिठासीन न्यायाधीश श्रीमती पि.डी. मेंढे)**

**न्यायनिर्णय**

**(दिनांक ०५ मे, २०२६ रोजी पारीत)**

**नियमित फौजदारी मामला क्रमांक ५२४/२०२१.**

**अपराध क्रं. ६९१/२०२१, पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद).**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद),<br>ता. जळगाव (जामोद), जिल्हा बुलढाणा. |
| यांचे तर्फे | सहा. सरकारी अभियोक्ताः श्री. ए.जे. इंगळे |
| **आरोपी** | **प्रभुदास भिकाजी अवचार**<br>वय–४० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>आरोपी रा. खेर्डा बु., ता. जळगाव जामोद,<br>जि. बुलढाणा. |
| यांचे तर्फे | विद्वान वकील श्री. एस.एस. वानखडे |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १७/०८/२०२१ |

| | |
|---|---|
| प्रथम खबरचा दिनांक | २१/०८/२०२१ |
| दोषारोपपत्र दिनांक | २७/०९/२०२१ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३०/११/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक | ०५/०५/२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | निरंक. |

**आरोपींची माहिती**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | आरोपीच्या जमानतचा दिनांक | कलम व कायदा | आरोपी दोषी किंवा निर्दोष | शिक्षा झाल्याचा दिनांक | कलम ४२८, फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभुदास भिकाजी अवचार | निरंक | ३०/११/२१ | भा.दं.वी. कलम ३२३,३२४, ५०४,५०६ अन्वये दंडनिय अपराध, | निर्दोष | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे / बचावपक्षाचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | गजानन लक्ष्मण म्हसाळ (नि.क्र.२३) | पंच |
| सा.क्र. २ | सागर अजाबराव सौदागर (नि.क्र.२६) | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | नंदकिशोर सुखदेव बंबटकार (नि.क्र.२७) | साक्षीदार |

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक १७/०८/२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी–प्रकाश सुखदेव बंबटकार हे चांगेफळ येथे बैलगाडी घेवुन खत आणण्याकरीता जात असतांना आरोपी हा त्यांच्या शेतातील धुऱ्यावर गवत कापतांना दिसुन आल्यामुळे फिर्यादीने आरोपीला तु माझे शेताच्या धुऱ्यावरील गवत का कापले असे म्हटले असता त्याने फिर्यादीला तुझे शेताच्या धुऱ्यावरील गवत कापले नाही असे म्हटले. त्यावरून फिर्यादीने त्याला तु गवत कापले वरून खोटा बोलतो असे म्हटले असता आरोपीने एकदम फिर्यादीच्या मानेवर बुक्का मारल्यामुळे तो खाली पडला, त्यानंतर त्याच्या डाव्या मांडीवर, पोटावर, डावे खांद्यावर लाथा मारून त्याच्या हातातील उलटा विळा फिर्यादीच्या कपाळावर मारला तसेच त्याने त्याच्या हातातील दोराने त्याला दोन झोडपे मारले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची दिली होती. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली.

३. फिर्यादीने आरोपीविरुध्द दिलेल्या फिर्यादवरुन अपराध क्रमांक ६९१/२०२१ भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. तपासा अंतर्गत संबंधीत तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. त्याचप्रमाणे फिर्यादीचे व साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपत्र न्यायालयात सादर केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत दोषारोप (निशानी क्र.१२) निश्चीत करण्यात आला आणि आरोपीने सदर आरोपांचा त्यांना गुन्हा कबुल नसल्याचे आणि खटला चालविण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपीचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थीत होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १७/०८/२०२१ रोजी १७.०० वाजताच्या दरम्यान मौजा खेर्डा बु., ता. जळगाव जामोद येथे आरोपीने फिर्यादी यांच्या मानेवर बुक्का मारून खाली पाडले तसेच उलटा विळा त्याचे कपाळावर मारला व तुमच्या हातातील दोराने दोन झोडपे मारून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| २. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना डावे मांडीवर, पोटावर, डावे खांद्यावर लाथा मारून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| ३. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांचा उद्देशपूर्वक अपमान करून अपराध करण्यासाठी प्रवृत केले व त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ५०४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी**. |
| ४. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना जिवाने मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे आरोपीने भा.दं.वि. चे | **नकारार्थी**. |

| | | |
|---|---|---|
| | कलम ५०६ नुसार गुन्हा केला ? | |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरूद्ध दोषसिद्धी करण्यासाठी तीन साक्षदारांना तपासले. घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.१ गजानन लक्ष्मण म्हसाळ यांची साक्ष (नि.क्र.२३), साक्षीदार क्र.२ सागर अजाबराव सौदागर यांची साक्ष (नि.क्र.२६) व साक्षीदार क्र.३ नंदकिशोर सुखदेव बंबटकार यांची साक्ष (नि.क्र.२७) वर तपासण्यात आली. आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ चे बयाण नोंदविण्यात आले नाही.

**<u>मुद्दा क्र १ ते ४:-</u>**

**७.** मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकत्र विचारात घेतले.

**८.** साक्षीदार क्र. १ गजानन म्हसाळ यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखतात. दि. २२/०८/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनामा कार्यवाहीकरीता कोठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला नव्हता तसेच आरोपीकडून काहीही जप्त केले नव्हते. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कोणतीही पंचनामा कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांना सही मागितली म्हणुन त्यांनी सही केली होती. त्यांच्या साक्षेवरून त्यांनी जरी पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे सांगितले पण त्यातील मजकुराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे स्पष्ट होते.

**९.** साक्षीदार क्र.२ सागर सौदागर यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखतात. फिर्यादी प्रकाश बंबटकार आज हयात नाही. फिर्यादी

व आरोपीमध्ये झालेल्या घटनेबाबत त्यांना काहीही माहिती नाही. त्यांनी नाकारले की, आरोपी फिर्यादीला मारत असतांना त्यांनी बघितले होते व त्यांचे भांडण सोडविले होते व तसा त्यांनी पोलीसांना जबाब दिला होता. अभियोग पक्षाला त्यांनी सहकार्य केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराला अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारले असता सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारात्मक दिली. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही.

**१०.** साक्षीदार क्र.३ नंदकिशोर बंबटकार यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखतात. फिर्यादी प्रकाश बंबटकार हा त्यांचा भाऊ असुन तो दि.०५/०३/२०२४ रोजी मरण पावला आहे. घटनेच्यावेळी ते बाहेरगावी होते. घटनेबाबत त्यांना त्यांच्या भावाने वाद झाला होता असे सांगितले होते. त्यांनी त्याला दवाखान्यात नेले होते. त्यांच्या भावाचा जिव घाबरत होता म्हणुन त्यांनी खामगाव येथील दवाखान्यात नेले होते. त्यांनी पोलीसांना बयान दिले नव्हते. साक्षदार क्र. ३ यांनीसुध्दा आरोपीने त्यांच्या भावाला शिवीगाळ करून मारहान केली व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले. त्यांचा पुरावा सुध्दा ऐकीव स्वरूपाचा असुन अभियोग पक्षाला त्यांनी सहकार्य न केल्यामुळे ग्राह्य धरता येणार नाही.

**११.** सदर प्रकरणातील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षदार क्र. १ ते ३ यांनी अभियोग पक्षाला सहाय्य केले नाही. तसेच अभिलेखावरून फिर्यादी यांचा मृत्यु झालयाचे दिसुन येत आहे. इतर साक्षदारांना समंन्स व जमानती अधिपत्रे तामील होऊनही ते न्यायालयात हजर झाले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र. १ वर आदेश पारीत करू बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द अभिलेखावर कोणताही पुरावा न आल्यामुळे आरोपीने फिर्यादी यांना मानेवर बुक्का मारून खाली पाडले तसेच उलटा विळा त्याचे कपाळावर मारून हातातील दोराने दोन झोडपे मारले तसेच मांडीवर, पोटावर व खांद्यावर मारहाण केली हे सिध्द झाले नाही. अभियोग पक्षाने ज्या

कलमाखाली सदरचे प्रकरण दाखल केले त्या कलमातील पूरक घटक अभियोग पक्ष निसंशयपणे सिद्ध करू शकले नाही. अभिलेखावर आलेला पुरावा आरोपीला शिक्षेपर्यंत नेण्याचा गुणवत्तेचा नाही. करीता मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ५:–</u>**

**१२.** मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यास अयशस्वी ठरला. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>– आ दे श –</u>**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने संपरिक्षेदरम्यान दाखल केलेली वैयक्तीक व जमानती बंधपत्रे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) नुसार ६ महिन्यापर्यंत कायम ठेवण्यात येतात. सदर कालावधीत या प्रकरणात आवाहन न झाल्यास बंधपत्रे रद्द होतील व जमानतदार बंधपत्रातून मुक्त होतील.

३. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुल्यहीन एक लोखंडी विळा व एक सुती दोर अपील कालावधी संपल्यानंतर नियमानुसार नष्ट करण्यात यावा.

४. न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PRITI DNYANESHWAR MENDHE
Date: 2026.05.05 17:28:01 +0530

ठिकाण– जळगाव (जामोद). (श्रीमती प्रिती ज्ञा. मेंढे)
दिनांक: ०५/०५/२०२६. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
जळगाव (जामोद).

**नि.फौ.ख.क्र. ५२४/२०२१.** **न्यायनिर्णय.**

**शासन विरूध्द प्रभुदास.** **नि.क्र.३१.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः– दिपक के. मतकर, लघुलेखक श्रेणी –३.

कोर्टाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जळगाव जामोद.

दिनांकः– ०५/०५/२०२६.